# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com



**प्रेसनोट क्र.६०५ दिनांक २२/०७/२०२०**


## अट्टल मोटर सायकल चोर तुळींज पोलीसांच्या जाळ्यात

नालासोपारा पुर्व परिसरात तुळींज पोलीस ठाण्याचे हद्दीत मोटर सायकल चोरीचे घटनांना आळा घालण्याकरिता मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,सो, पालघर, मा.श्री. विजयकांत सागर, अप्पर पोलीस अधीक्षक, वसई विभाग व मा.श्री.अमोल मांडवे, उपविभागिय पोलीस अधिकारी, नालासोपारा यांनी सदर मोटर सायकल चोरींचा आढावा घेवून अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेवून त्यांना अटक करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

तसेच श्री.डी.एस.पाटिल वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री.संदीप व्हसकोटी यांना सदरच्या चोरीच्या घटनांना पायबंद बसविण्याकरीता त्यांची सत्वर उकल करण्याबाबत आदेश दिलेले होते. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप व्हसकोटी यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे संशयीत इसम नामे मनवर मेहबुब शेख,वय-१९ वर्षे, धंदा- बेकार, रा. रुम नं ४०४ महादेव अपार्टमेंन्ट रोड नं ०३ अग्रवाल नालासोपारा पुर्व ता वसई जि पालघर यास ताब्यात घेऊन त्यास चौकशी केली असता त्याने तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत धानीव नालासोपारा पुर्व वसई पश्चिम व पुर्व परिसरात एकूण ४ ठिकाणी मोटर सायकल चोरीचे गुन्हे केलेले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याचेकडून १,०५,०००/- रुपये किंमतीचे मोटर सायकल हस्तगत करण्यात आलेले आहेत

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं |
|---|---|---|
| १. | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ५६४/२०२० भादवियस कलम ३७९ प्रमाणे |
| २. | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ९०५/२०१९ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ५९१/२०१९ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ७६/२०२० भादविस कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगीरी श्री.अमोल मांडवे, उपविभागिय पोलीस अधिकारी, नालासोपारा व श्री. जे.जी.वळवी पोलीस निरीक्षक (गुन्हे), तुळींज पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप व्हसकोटी, सफौ/शिवानंद सुतनासे, पोहवा/युवराज जावळे, पोना/आनंद मोरे पोना/संदीप शेरमाळे, पोना/शेखर पवार, पोना/प्रशांत सावदेकर,पोशि/सुखराम गडाख, पोशि/योगेश नागरे, यांनी केली आहे


Scanned with CamScanner